# 'शुक्रतारा' माझ्या भाग्याचा

## गायक अरुण दाते यांच्याशी बातचीत

विजय न्यायाधीश
cnx@lokmat.com

**सुप्रसिद्ध गायक अरुण दाते यांनी आपल्या मृदू मुलायम आवाजाने गेल्या तीन पिढ्यातील रसिकांच्या मनाला मोहिनी घातलेली आहे. त्यांच्या आवाजातील 'शुक्रतारा मंद वारा' या गाण्याला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल व्यावसायिक स्वरूपातील त्यांच्या मैफलीचा औरंगाबादेत रविवारी शेवटचा प्रयोग झाला. रसिकांच्या मनाशी संवाद साधणाऱ्या 'शुक्रतारा'च्या चिरंतन कलाकृतीबाबत अरुण दाते यांच्यांशी केलेली ही बातचीत.**




**औरंगाबाद, दि. २६- मनामनाशी संवाद साधणारे शब्द असतील, फक्त ह्याच शब्दांशी एकरूप होण्यासाठी जन्माला आलेला स्वराकृतीबंध असेल आणि हे स्वरलयरूप लिलया पेलणारा मधुर गळ्याचा नाद असेल, तर ती कलाकृती चिरंतन होते.**

ही चैतन्यमयी कलाकृती अजरामर होऊन अनंत काळ पिढ्यानपिढ्या मनामनाशी संवाद साधू शकते. याची प्रचीती देणारे एक भावगीत म्हणजे 'शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातूनी' गेल्या तीन पिढ्या हे गीत रसिकांच्या हृदयात ध्रुवतारा बनून अढळपद प्राप्त होऊन बसले आहे. मराठीतील एक सर्वोत्तम आणि सदाबहार अशा या गाण्याला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सुप्रसिद्ध गायक अरुण दाते यांच्या मैफलीचे रविवार, दि. २५ रोजी शहरात आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने लोकमत सीएनएक्सशी त्यांनी मनमोकळा संवाद साधला. रसिकांच्या मनाचा डाव घेणाऱ्या या गीताबद्दल बोलताना अरुण दाते यांनी सांगितले की, मराठी साहित्यातील दिग्गज कवी मंगेश पाडगावकर यांच्या उत्तुंग प्रतिभेतून स्फुरलेले शब्द, त्यांच्या तोडीस तोड कल्पक संगीत दिग्दर्शक श्रीनिवास खळे यांनी दिलेले अवीट गोडीचे श्रवणीय संगीत आणि त्याला साजेशी सुधा मल्होत्रा या गायिकेची स्वरसाथ लाभलेलं 'शुक्रतारा मंद वारा' हे गाणं मला गायला मिळालं ही माझ्यासाठी निश्चितच भाग्याची गोष्ट आहे. पन्नास वर्षांपूर्वी गायलेल्या या गाण्याची गोडी आजही कायम आहे, याचा मला आनंद वाटतो. नुसताच आनंद नाही, तर अभिमानही वाटतो! या गाण्याच्या आठवणीत दातेसाहेब रंगून गेले होते. श्रीनिवास खळे हे गाणे घेऊन जेव्हा माझ्याकडे आले तेव्हा मी या गाण्याबाबत फारसा उत्सुक नव्हतो. तेव्हा खळेंनी माझ्या वडिलांना सांगितले की, 'शुक्रतारा..' हे गाणे मी तुमच्या मुलासाठी केले आहे. ते त्याने गायले नाही, तर मी ते तसेच राहू देईन. खळेंचा एकंदर आविर्भाव लक्षात घेता वडिलांनी मला ते गायला लावले आणि आज त्या गाण्याने जो इतिहास निर्माण केला आहे, तो तुमच्या समोर आहे!

विशेष म्हणजे 'शुक्रतारा'च्या आधी दातेसाहेब हिंदी गाणी आणि उर्दू गझल गायनाचे कार्यक्रम करायचे. उर्दू माध्यमात शिक्षण झाल्याने त्यांना त्या भाषेची उत्तम जाण आहे. 'शुक्रतारा...'नंतर त्यांनी आपल्या कार्यक्रमात मराठी गीतांचा समावेश करायला सुरुवात केली, मात्र पहिल्यापासून कार्यक्रमांमधून स्वतःचीच गाणी सादर करण्याचा त्यांनी निश्चय केला होता आणि आजतागायत त्यांनी तो कसोशीने पाळला आहे. या त्यांच्या वैशिष्ट्यामुळेच संगीत क्षेत्रात स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात त्यांना यश आले. संख्यात्मक पातळीवर भर न देता गुणात्मक आणि दर्जेदार गाण्यांना प्राधान्य देत स्वतःचा एक रसिकवर्ग त्यांनी निर्माण केला. आतापर्यंत माझ्या आवाजात फक्त सव्वाशे गाणी ध्वनिमुद्रीत झाली आहेत. माझ्याकडे आलेलं गाणं हे मी त्या गाण्याला असलेलं साहित्यिक मूल्य, काव्यातील प्रतिभा, शब्दरचना, त्यातील भाव आणि त्याला दिलं जाणारं संगीत या सगळ्या गोष्टी विचारात घेऊनच गाण्यासाठी होकार द्यायचो. अर्थात ही माझी पद्धत होती. रसिकांची अभिरुची संपन्न करणारी गाणी गाण्यावर मी नेहमीच भर देत आलो असल्याचे दाते यांनी आवर्जून सांगितले. आज मला जे काही यश मिळाले आहे, त्यामध्ये माझे वडील, गुरू के. महावीर, मंगेश पाडगावकर, श्रीनिवास खळे, यशवंत देव, तसेच माझ्यावर मनापासून प्रेम करणारे रसिक या सगळ्यांचा वाटा आहे. अलीकडील काळात भावगीतांची वाणवा आहे. गाण्यामध्ये शब्दांपेक्षा वाद्यांचा दणदणाट वाढत चालला आहे. शब्दांना दुय्यम स्थान देत ह्रिदम बेसची जी गाणी तयार होत आहेत, ती फार काळ टिकणार नाहीत, असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी नोंदविले. सुरेश वाडकर आणि स्वप्नील बांदोडकर हे गायक मला आवडतात. आजच्या युवा पिढीतील कलावंतांना मी ऐकलेले नाही. कदाचित त्या ताकदीने गाणे पेश करणारा कोणी कलावंत नसेल, याबाबत त्यांनी प्रकर्षाने खंत व्यक्त केली. व्यावसायिक स्वरूपातील 'शुक्रतारा' हा कार्यक्रम औरंगाबादमध्ये शेवटचा असला तरी रसिकांच्या प्रेमाखातर खाजगी मैफलीसाठी आमंत्रण दिल्यास आपण आवर्जून येणार असल्याचे दाते यांनी सांगितले. अरुण दाते यांचा हा शेवटचा कार्यक्रम राजू परदेशी यांच्या व्यवस्थापनाखाली एस. ए. इव्हेंटने आयोजित केला होता. संत एकनाथ रंगमंदिरात झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ मनपाचे सभागृह नेता नगरसेवक राजू वैद्य, गायक अरुण दाते, निर्माते अतुल दाते, राजू परदेशी आणि एस. ए. इव्हेंटच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आला.

### अरुण दाते यांनी गायलेली काही सुमधुर गाणी

- शुक्रतारा मंद वारा...
- भातुकलीच्या खेळामधली राजा आणि राणी
- स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला
- या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम...
- दिवस तुझे हे फुलायचे
- दिल्या घेतल्या वचनांची
- भेट तुझी माझी स्मरते
- जपून चाल पोरी जपून चाल
- डोळ्यात सांजवेळी आणू नकोस पाणी
- संधीकाली या अशा धुंदल्या दिशा...